# प्रेस नोट

दिनांक : २५/०७/२०२४

## ३३ वर्षापासुन फरारी असलेल्या आरोपीतास फेरअटक केले बाबत.

---

पायधुनी पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद क्रं.४१५/१९९०, कलम ४२० भादवि हया मधील अटक आरोपी नामे पवन गोपीकृष्ण मोदी, रा.ठी.खार,मुंबई याच्या विरुध्द मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, २ रे न्यायालय, मांझगाव मुंबई यांच्या न्यायालयात कोर्ट केस क्र. ९५०/पी/१९९१ अन्वये खटला चालु आहे. सदर खटल्यातील नमुद आरोपी नामे पवन गोपीकृष्ण मोदी हा सदर खटल्याच्या सुनावणीकामी मा. न्यायालयात गैरहजर रहात असल्याने त्यास मा न्यायालयाने फरारी (Absconder ) घोषित केले होते. सदर आरोपी हा स्वतःचे अस्तित्व लपवुन सतत राहण्याची जागा बदलत होता.

सदर आरोपी हा सन १९९१ पासुन फरारी होता. पायधुनी पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उप निरीक्षक अनिल वायाळ व त्यांच्या पथकाने तांत्रीक विश्लेषण करुन सदर फरारी आरोपी हा पुणे येथील मुंडवा परीसरात राहत असल्याची माहीती प्राप्त करुन आज रोजी त्यास मुढवा परीसरातुन शिताफिने ताब्यात घेतले आणि पायधुनी पोलीस ठाणे येथे आणुन वरील गुन्हयात मा सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वाचे तंतोतंत पालन करुन फेर अटक केली आहे. सदर आरोपीस मा न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयाने ताब्यात घेवुन न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त मा. अभिनव देशमुख सो., मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २, मा. डॉ मोहितकुमार गर्ग सो., मा. सहाय्यक पोलीस आयुक्त पायधुनी विभाग श्रीमती ज्योत्सना रासम, पायधुनी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बाळकृष्ण देशमुख सो., पोलीस निरीक्षक श्री. नितीन पगार (गुन्हे) यांच्या मार्गदशनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक अनिल वायाळ, पोह. कैलास भोईटे, इरफान खान, दिपक निकम, पो शि.शंकर राठोड, प्रकाश अलदर नितेश घोडे यांनी केली आहे.

--oo--



(बाळकृष्ण देशमुख)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई

Scanned with CamScanner